संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
आणि
श्री दादासाहेब गवई चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित

# तक्षशिला महाविद्यालय, अमरावती समाजशास्त्र विभाग
आणि
# मराठी समाजशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३० वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. २३ व २४ जानेवारी २०२०

-: विषय :-
## भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती

स्थळ
"राजवाडा"
देशमुख लॉन समोर, शेगाव नाका रोड, अमरावती

आयोजक
समाजशास्त्र विभाग
तक्षशिला महाविद्यालय, अमरावती

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist - Gadchiroli

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
आणि
श्री दादासाहेब गवई चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित

# तक्षशिला महाविद्यालय, अमरावती समाजशास्त्र विभाग

आणि

# मराठी समाजशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३० वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. २३ व २४ जानेवारी २०२०

-: विषय :-

## भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती

**स्थळ**

**"राजवाडा"**

देशमुख लॉन समोर, शेगाव नाका रोड, अमरावती

**आयोजक**

समाजशास्त्र विभाग

तक्षशिला महाविद्यालय, अमरावती

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# Takshashila Mahavidyalaya, Amravati
## Department of Sociology & Marathi Samaj Shashtra Parishad
**Organised**
**TWO DAY NATIONAL CONFERENCE**
**ON**
**HUNDRED YEARS OF SOCIOLOGY IN INDIA**

**ISBN : 978-81-941195-4-8**

**Publication :** Shabdkanti Prakashan, Amravati.

**Owner :** Secretary, Shri. Dadasaheb Gawai Charitable Trust, Amravati

**Published By :** Principal, Takshashila Mahavidyalaya, Amravtai.

**Printed By :** Atharv Graphics, Amravati

**Patron**
Dr. Kamlatai R. Gawai, Founder President, SDGCT, Amravati.
Mrs. Kirtitai Rajesh Arjun, President, SDGCT, Amravati.

**Adviory Board**
Prof. P. R. S. Rao, Secretary, SDGCT, Amravati.
Dr. Padwal Mallu, Principal, Takshashila Mahavidyalaya, Amravati
Dr. Saroj Aglawe, President Marathi Samajshashtra Parishad.
Dr. Dipak Pawar, Secretary, Marathi Samajshashtra Parishad.
Dr. Rahul Bhagat, Treasurer, Marathi Samajshashtra Parishad.
Dr. K. M. Akotkar.
Dr. P. R. Abhyankar.
Dr. Daya Pande.
Prof. Nandkishor Raut.
Dr. Sanjay Bhagat.
Dr. Pradip Ambore.
Prof. Sandip Hadole.

**Editor :** Dr. Anjali R. Wath.

**Board of Editor :** Prof. Pritesh Patil.
Prof. Pravin Wankhade
Prof. Sachin Pandit.

**Cover Page Design :** Gajanan Dhole

**Type Setting :** Atharv Graphics Amravati,

**Date of Publication :** Thurday, 23rd January, 2020

**Note :** 1) The Souvenir is for private distribution only. 2) The Editor and the Board of Editors may or may not agree with the thoughts of the writers in case of authenticity of their paper.

[All the rights are reserved by Publication.]

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# INDEX


| अ. क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ कमांक |
|---|---|---|---|
| * | **बिजभाषण**<br>भारत में समाजशास्त्र की शताब्दी यात्रा के कुछ पहलू | आनंदकुमार | i-x |
| 1 | थोर समाजशास्त्री डॉ. आंबेडकराच्या चळवळी | डॉ. कमलकिषोर बा. इंगोले | 01 |
| 2 | समाजशास्त्राच्या विकासात मराठी समाजशास्त्रज्ञांचे योगदान | प्रा. डॉ. व्ही. जी. चव्हाण | 04 |
| 3 | १९ व्या शतकातील सामाजिक चळवळ आणि सामाजिक विचारवंतांचे अस्पृश्यता उध्दाराचे कार्य | प्राचार्य डॉ. प्रशांत के पाठक | 09 |
| 4 | मराठी समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण योगदान | प्रा.डॉ. यादव घोडके, | 13 |
| 5 | # ME TOO आंदोलन : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.अर्चना राजकुमार कांबळे (जगतकर) | 17 |
| 6 | सामाजिक. चळवळी व समाजशास्त्र | श्री. किरण चंद्रशेखर कानडे | 21 |
| 7 | भारतीय महिलांची सामाजिक स्थिती | आम्रपाली गोविंदराव तिव्हाळे | 26 |
| 8 | आद्य भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. जी. एस. घुर्ये यांचे समाजशास्त्रीय योगदान | विवेक विलास गिरी | 29 |
| 9 | भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे | डॉ. धनंजय का. सोनटक्के | 34 |
| 10 | महाष्ट्रातील ग्रामीण भागातील कुपोषण एक आव्हान | प्रा.डॉ.एस.जी. अन्सारी | 41 |
| 11 | भारतीय समाजशास्त्रज्ञाचे समाजशास्त्राच्या विकासातील योगदान | प्रा.डॉ.सतीश गंगाराम ससाणे | 45 |
| 12 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | प्रा.डॉ.कांबळे बी.एम. | 49 |
| 13 | भारतीय समाजशास्त्रज्ञाचे समाजशास्त्राात असणारे योगदान एक : सामाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. साधना बुरडे<br>श्री किशन पवित्रे | 52 |
| 14 | डॉ. एम. .एन. श्रीनिवास यांचे भारतीय समाजशास्त्रात योगदान | प्रा. डॉ. डी. एस. नामूर्ते | 57 |
| 15 | भारतातील सामाजिक चळवळी आणि समाजशास्त्र | प्रा. विनोद एस. शेंडे | 61 |
| 16 | संस्कृतीकरण : डॉ. एम.एन. श्रीनीवास यांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ. राहुल भगत, | 65 |
| 17 | भारतातील समाजशास्त्राचा पुनर्विचार | प्रा.कांबळे संजयकुमार | 71 |
| 18 | स्त्रीमुक्ती चळवळीपुढील आव्हाने : समाजशास्त्रीय विश्लेषण | डॉ. मुधोळकर जी. आर. | 78 |
| 19 | मराठी समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ. नलिनी आय. बोरकर, | 81 |
| 20 | डी. जी. एस घुर्ये यांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ. दयानंद उत्तरमराव राऊत | 88 |
| 21 | सद्यस्थितीत समाजशास्त्रज्ञासमोरील आव्हाने कार्य | प्रा.डॉ.रेणुका द. बडवणे | 90 |


Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# समाजशास्त्राच्या विकासात मराठी समाजशास्त्रज्ञांचे योगदान

प्रा. डॉ. व्ही. जी. चव्हाण
समाजशास्त्र विभाग प्रमूख
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,
देसाईगंज जि. गडचिरोली .

---

प्रस्तावणा :–

भारतात खऱ्या अर्थाने 1917 नंतर समाजशास्त्राच्या अभ्यासाला सुरुवात झाली. भारतीय समाजाचे अध्ययन करणाऱ्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. केतकर, डॉ. जी. एस. घुर्ये अशा पहिल्या पिढीतील सर्व अभ्यासकांनी भारतातील जाती व्यवस्थेचे अध्ययन केले. यामध्ये डॉ. जी. एस. घुर्ये यांनी विद्यार्थी दशेपासून जातीव्यवस्थेचा समाजशास्त्रीय अध्ययन करण्याच्या कार्यात स्वतःला वाहुन घेतले. भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनाला चालना देऊन समाजशास्त्र विषयांचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने महत्वपुर्ण कार्य डॉ. जी.एस. घुर्ये यांनी केले. म्हणुन भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणून डॉ. जी. एस. घुर्ये यांना ओळखले जाते. कारण जातीव्यवस्थेचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीने कसा करावा? याचा आदर्श डॉ. घुर्ये यांनी स्वतः च्या अध्ययनातून निर्माण केला. असे म्हणजे वावगे ठरणार नाही. त्यानंतर दुसऱ्या पिढीत डॉ. इरावती कर्वे, डॉ. श्रीनिवास, डॉ. कपाडिया डॉ. मुखर्जी यासारख्या अभ्यासकांनी समाजशास्त्राच्या अभ्यासात महत्वपूर्ण योगदान दिले.

समाजशास्त्र हा आधुनिक शास्त्र :–

समाजशास्त्र हा आधुनिक शास्त्र आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासाला 19 व्या शतकात सुरुवात झाली. फ्रेंच विचारवंत ऑगस्त कॉम्त यांनी 1838 मध्ये प्रत्याक्षानुसारी तत्वज्ञान Pasitive Philasophy हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात Sociology हा शब्द सर्वप्रथम उपयोगात आणला. तेव्हापासून समाजशास्त्राच्या अध्ययनाला सुरुवात झाली. म्हणून फ्रेंच विचारवंत ऑगस्त कॉम्तला समाजशास्त्राचे जनक म्हणतात.

ऑगस्त कॉम्त नंतर हर्बट स्पेन्सर, ईमाइल दुर्खीम, मॅक्स वेबर, जॉर्ज सिमेल, सी.एच. कुले, पॅरेतो, सम्नर, मॅक आयव्हर पेज, सारोकिन, पाससन्स, रॉबर्ट मर्टन, होमन्स यासारख्या पाश्चात्य समाजशास्त्रांनी समाजशास्त्राच्या विकासात महत्वाचे योगदान दिलेले आहे. ब्रिटीश राजवटीत बऱ्याच इंग्रज अधिकारी आणि अभ्यासकांनी भारतीय समाजाचे अध्ययन केलेले आढळून येतात. परंतु हे अध्ययन समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून करण्यात आलेले नव्हते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून भारतीय समाजाचे अध्ययन करण्याचे श्रेय डॉ. एस. व्ही. केतकर, डॉ. बी. आर. आंबेडकर व डॉ. जी.एस. घुर्ये इत्यादी समाजशास्त्रज्ञांना दिला जातो.

डॉ. एस.व्ही. केतकर यांनी भारतातील जातीचा इतिहास ( History Of Caste in India Newyark, 1909 ) व समाजशास्त्र Sociology, 1910 मध्ये हा ग्रंथ लिहिला. डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी अमेरीकेच्या कोलंबिया विद्यापीठात 9 मे 1916 ला डॉ. गोल्डनवायझर मानववंशशास्त्रीय परिषदेत भारतातील जातीची घडण, उत्पती आणि विकास Caste in India, Its Mechanism, Genesis and Development हा भारतातील जाती व्यवस्थेच्या संदर्भात संशोधनपर पेपर सादर केला होता. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांनी, डॉ. केतकराच्या जातीव्यस्थेची दखल घेतली होती. त्याचबरोबर जातीव्यवस्थेचे निर्मुलन Anninilation Of Caste क्रांती आणि प्रतिक्रांती, रसेल आणि समाजाचे पुनर्निर्माण अस्पृश्य इत्यादी संशोधनपर ग्रंथ डॉ. बाबासाहेबांनी लिहिले होते. म्हणून डॉ. एस. व्ही. केतकर, डॉ. बी. आर. आंबेडकर आणि डॉ. जी.

ISBN No. : 978-81-941195-4-8


Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist - Gadchiroli

एस. घुर्ये हे त्रीरत्न भारतातील समाजशास्त्राची पहिली पिढी आहे. हे भारतीय समाजशास्त्राज्ञांसाठी भूषण आहे. या तीन समाजशास्त्रापैकी डॉ. जी.एस. घुर्ये यांनी आपले संपुर्ण आयुष्य फक्त समाजशास्त्राचे अध्ययन, अध्यापन, संशोधन, आणि लेखन कार्यामध्ये वाहून घेतले. म्हणूनच भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ. जी.एस. घुर्येला संबोधले जाते.

1919 मध्ये सर पॅट्रिक गिडीस यांच्या नेतृत्वाखाली मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विषय सुरु करण्यात आला. सर पॅट्रिक गिडीस यांच्या प्रेरणेमुळे डॉ. जी. एस. घुर्ये समाजशास्त्र या विषयाकडे वळले. त्यांना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी इगलंड मधिल केंब्रीज विद्यापीठात पाठविण्याची शिफारस मुंबई विद्यापीठाकडे करण्यात आली. त्यामुळे घुर्येना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स व केंब्रीज विद्यापीठात प्रवेश मिळाला. डॉ. रिव्हर्स व हॅडन यांच्या मार्गदर्शनाखाली 1923 मध्ये 'जातीचा मानववंशासंबंधीचा सिध्दांत' या प्रबंधा बद्दल पीएच. डी. देऊन घुर्येना सन्मानीत करण्यात आले.

1924 मध्ये घुर्ये भारतात परत येऊन एल्फीन्स्टन महाविद्यालयात समाजशास्त्र विषय शिकविण्यास सुरु केले. आणि नंतर जुन 1924 मध्ये मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विषय शिकविण्यास सुरु केले. विशेष म्हणजे 1936 ते 1968 या दरम्यान त्यांच्या मार्गदर्शनाखाली 81 विद्यार्थ्यांना पी.एच.डी. ने सन्मानित करण्यात आले. हे गौरवाची बाब समजावी लागेल, नंतर दुसऱ्या पिढीतील समाजशास्त्रज्ञ म्हणून डॉ. श्रीनिवास, डॉ. कपाडीया, डॉ. विलास संगले, डॉ. दामले, डॉ. कुलकर्णी, डॉ. प्रधान हे प्रमुख संशोधन आहेत. या समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्राच्या विकासात भरीव कामगिरी केली. त्यामुळे समाजशास्त्रज्ञ घडविण्यात डॉ. जी.एस. घुर्येचे योगदान अतिशय महत्वपुर्ण आहेत.

डॉ.घुर्ये यांनी 23 संशोधनपर ग्रंथ लिहिले आहेत. तसेच असंख्य शोधनिबंध विद्वतमान्य नियतकालीकातून प्रसिद्ध झालेले आहेत. भारतातील जाती आणि वंश, आदिवासी कुटूंब संस्था, वैवाहिक संबंध, सामाजिक तनाव, भारतीय परंपरा, संस्कृती आणि समाज, धर्म विषयक जाणीव या विषयावर ग्रंथ लिहिलेले आहे.

आफ्रिकन निग्रोचे वंश संबध, अमेरिकन स्त्रीयांचे लैंगिक जीवन या विषयावर सुद्धा ग्रंथ लिहिले आहेत. रजपुत, वास्तुशिल्प, भरतनाटय आणि त्यांच्या परंपरासारखे विषय सुद्धा त्यांच्या संशोधनात समाविष्ठ आहेत.

भारतातील पहिले संशोधक :–

डॉ. घुर्ये हे भारतातील समाजशास्त्राचे पहिले संशोधक आहे. ज्यांनी विविध गटाच्या तनावाची कारणे आणि स्वरुपाचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करण्याचा प्रयत्न केला. भारताच्या फाळणीमुळे हिंदु – मुस्लीम यांच्या संबधात काटूता निर्माण झाली. तेव्हा त्यांच्यातील कटू संबध देशातील सामाजिक संघर्षाचा एक महत्वाचा स्त्रोत आहे. ज्यामुळे भारताची एकता धोक्यात येऊ शकेल असे सुचक प्रतिपादन डॉ. घुर्ये यांनी केले होते.

भारतातील सामाजिक तनाव :–

भारतात स्वातंत्र्यापासून राष्ट्रीय एकात्मतेची समस्या निर्माण झाली. राष्ट्रीय एकात्मतेची समस्या ही समस्या प्रामुख्याने सामाजिक तनावातून उद्भवली असल्याचे प्रतिपादन डॉ. घुर्ये यांनी केले. त्याचबरोबर राष्ट्रीय एकात्मतेची समस्या अल्पसंख्याकाचा प्रश्न हे सर्व सामाजिक तणावाशी संबधित आहे. असे मत डॉ. घुर्ये यांनी मांडले होते. या प्रश्नांचे समाजशास्त्रीय अध्ययन करुन Social Tensions of India हा ग्रंथ 1968 मध्ये प्रसिद्ध केला.

भारतातील सामाजिक तनावाचे विश्लेषन :–

डॉ. घुर्ये यांनी हिंदु–मुस्लीमांमधील कटू संबंध आणि भाषा या दोन मुद्दयांची सविस्तर चर्चा करुन भारतातील सामाजिक तनावाचे विश्लेषण केले. तनाव संघर्ष आणि एकात्मता या

ISBN No. : 978-81-941195-4-8


Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College

मुद्दयांची सैंदांतिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून हिंदु – मुस्लीम संबंधाचे ऐतिहासिक परिक्षण केले. याचबरोबर हिंदू– मुस्लीमांमधील कला आणि शिल्पकला यांच्यातील एकतेला देखील आव्हान दिले. नंतर फाळणी संबंधीच्या घटनेचेही विश्लेषण केले. हिंदु – मुस्लीम मधील तनावाची जी मुलभुत कारणे आहेत. त्या कारणामुळेच देशात सतत तनाव राहिला. या तनावामुळे मुस्लीमांच्या अपेक्षा पुर्ण होवू शकल्या नाही. त्यांच्यात नैराश्य पसरला. भाषेच्या प्रश्नामुळे भारतात तणाव निर्माण झाल्याचे डॉ. घुर्ये यांनी स्पष्ट केले.

भारतीय जातीव्यवस्थेबाबतचा सिद्धांत :–

Caste and Race in India या ग्रंथात भारतीय समाजात खोलवर रुजलेल्या जातीव्यवस्थेचे विश्लेषण घुर्ये यांनी केला History of Civicization या ग्रंथ मालिकेमध्ये Caste and race in India हा पेपर 1932 मध्ये प्रसिद्ध झाला. नंतर हेच ग्रंथ Caste and class in India या नावाने 1950 मध्ये प्रसिद्ध केला. या ग्रंथात Occupation या प्रकरणाचा समावेश करुन Caste, Class and Occupation या नावने 1961 मध्ये ग्रंथ प्रसिद्ध केला. 1969 मध्ये Caste And Race in India हा ग्रंथ प्रसिद्ध केला. जातीच्या संदर्भात त्यांनी जाती समूहाचे स्वरुप, विभिन्न काळातील जाती, जातीचे प्रजातीय पैलू, भारताबाहेरील जातीचे तत्व, जाती प्रथाची उत्पती, व्यवसाय आणि जाती या सारख्या विविध पैलूवर समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून प्रकाश टाकला.

जाती निष्ठतेच्या धोक्याची पुर्वसुचना :–

निरनिराळया जातीचे गट सुसंघटित स्वरुपात तयार होत आहेत. पोटजातीच्या एकीकरणामुळे जातीनिष्ठा कमी होत आहे. असा समज आहे. परंतू तसे लहान, लहान जाती एकत्रित होऊन, त्यातून मोठया जातीचे निरनिराळे अभेद्य गट निर्माण होतील आणि त्यामुळे मोठया जातीतील वैमनस्य वाढेल असे प्रतिपादन डॉ. घुर्ये यांनी केले होते. या विधानात सत्यता आहे. अलिकडे जातीच्या नावावर अनेक संघटना, संस्था, निर्माण झालेल्या आहे. विशेष म्हणजे जातीनिष्ठ शाळा आणि महाविद्यालय उघडलेले आहेत. त्यावरुन डॉ. घुर्ये यांच्या संशोधनात असलेली दुरदृष्टी दिसून येते. म्हणून भारतात समाजशास्त्राचा पितामह म्हणून डॉ. जी. एस. घुर्ये यांना संबोधले जाते.

समाजशास्त्र या विषयाला आधुनिक काळात अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. गेल्या 100 वर्षाच्या काळात या शास्त्रातील शोधाचा तसेच संशोधन पद्धतीचा इतर सामाजिक शास्त्रावर प्रकर्षाने प्रभाव पडलेला आहे. म्हणजेच समाजशास्त्राच्या इतर सामाजिक शास्त्रांशी फार जवळचा संबध निर्माण झालेला आहे. जसे:–राज्यशास्त्र, मानवशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास या सामाजिक शास्त्राचा फार जवळचा संबंध आहे. यातून राजकीय समाजशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र, धर्माचे समाजशास्त्र, गुन्हाचे समाजशास्त्र, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र यासारखे स्वतंत्र विद्याशाखा निर्माण झालेल्या आहेत. एवढेच नव्हेतर कायदा व न्याय त्वतशास्त्र समाजशास्त्रीय संप्रदाय प्रस्थापित झाले. या क्षेत्राशी संबधित गुन्हेगार शास्त्र विकसित झाला. समाजशास्त्रीय अध्ययनाने कायदा व न्यायाच्या क्षेत्राला दिलेला अपहार होय . अशा प्रकारे समाजाच्या विविध अंगाच्या आणि व्यवहारांच्या अभ्यासाला एक नवा आयात, नवी दिशा आणि वास्तवावर लक्ष केंद्रित करणारी अभ्यास पद्धती समाजशास्त्रामुळे अन्य सामाजिक शास्त्रांना लाभले विदर्भातील नागपुर विद्यापीठात 1960 च्या दरम्यान समाजशास्त्र विषय सुरु करण्यात आला. त्या काळातील समाजशास्त्राच्या अभासकांमध्ये डॉ. टायलर, डॉ. भांडारकर, डॉ. तांराचंद मेश्राम, डॉ. खडसे, डॉ. प्रकाश बोबडे, डॉ. एस. आर. तोष्णीवाल, डॉ. प्रदीप आगलावे इत्यांदीना तिसऱ्या फळीतील समासशास्त्रज्ञ मानावे लागेल कारण यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक

ISBN No.: 978-81-941195-4-8


Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,

विद्यार्थी पी.एच.डी. संपादित करून समाजशास्त्राचे अध्ययन ,अध्यापन करीत आहे. त्यामुळे या मान्यवरांच्या अथक परिश्रमामुळे समाजशास्त्राच्या संशोधनात मोलाची भर पडली.

आज प्रत्येक विद्यापीठातील महाविद्यालयात समाजशास्त्र हा विषय शिकविला जात आहे. या शास्त्रात समाज जीवनाच्या सर्वांगिन अंगाचा अभ्यास होत असल्यामुळे हा विषय शिकणाऱ्यांची सख्या सुद्धा दिवसेंदिवस वाढत आहे. कारण समाजशास्त्रीय संशोधनाचा व्याप व कक्षा सतत रुदांवत आहेत ग्रामीण, नागरी आणि आदिवासी क्षेत्रामध्ये झपाटयाने होणाऱ्या घडामोडी, परिवर्तने हि संशोधकांना खुनावत आहेत. विशेष म्हणजे समाजवादी समाज रचेनेचे उद्दिष्टये स्विकारुन आणि त्याला अनुसरुन अशी अर्थव्यवस्था नियोजनाद्वारे कार्यान्वीत करण्यास प्रारंभ झाल्यापासून समाज जीवनावर आणि व्यक्तीवर ऐवढेच नव्हेतर सांस्कृतिक घटकांवर सुध्दा मोठया प्रमाणात बदल होत आहे. या सर्व गोष्टींनी समाजशास्त्रीय संशोधनाला एक प्रकारचा खादय पुरविला जात आहे. भारताच्या राजकिय व्यवस्थेत सतत व अलिकडे अत्यंत वेगाने घडणाऱ्या घडामोडीची समाजात परिवर्तन घडून येत आहे.

गलिच्छ वस्ती, त्यांचे प्रश्न, स्त्रीयांचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी, व्यवसनाधीनता, भ्रष्टाचार, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न, वाढते दंगे, जाळपोळ, अशा व्यापक विषयावर अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील व आदिवासी भागातील स्त्रियांचा दर्जा व भुमिका, अनाथ, अपंग, वृद्धांकडे होणारे दुर्लक्ष या सर्व बाबीचा समाजशास्त्रात अभ्यास होत असला तरी हा अभ्यास अजूनही अपुराच म्हणावा लागेल.

आजचा तरुण वर्ग आपल्या करिअरकडे लक्ष देण्याऐवजी मोबाईल फोनच्या माध्यमातून सोशल मिडीया, व्हॉस्ट् ॲपच्या मागे पडलेला आहे. नेट, इंटरनेटचा वापर करुन आपला मुल्यवान वेळ त्यामध्येच घालवित आहे. त्याचबरोबर झुंडशाहीच्या माध्यमाने वेगवेळया राजकीय पक्षाकडे वळत आहे. स्वतः च्या जीवनाकडे लक्ष न घालता दुसऱ्यांच्या सांगण्यावरुन वाद–विवादाकडे लक्ष केंद्रित करीत आहे. त्यामुळे गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ होत आहे. वाईट सवयी, व्यसने, पोषाख पद्धती, खाणपान, वेशभूषा, केशभूषा, आणि करमणुकीच्या साधनाकडे वळत आहे. नैराश्य वैफल्यातून खर्रा, गुटखा, तंबाखू, चरस, गांजा, दारु यासारख्या अंमलीपदार्थाकडे वळलेला आजचा युवकवर्ग समाजशास्त्रीय अभ्यासाला एक आव्हानच म्हणावा लागेल.

संदर्भ

1) रा.ज.लोटे :– सामाजिक विचारवंत
2) डॉ. प्रदिप आगलावे :– समाजशास्त्रीय विचारवंत
3) डॉ. एस. आर. तोषणिवाल :– भारतीय समाज समस्या आणि प्रश्न
4) डॉ. बी. एम. कऱ्हाडे :– समाजशास्त्रीय विचार चिंतन
5) डॉ. प्रदिप आगलावे :– समाजशास्त्रीय संकल्पना व सिद्धांत

Adarsh Arts & Commerce College (Desaiganj) ★

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

ISBN No. : 978-81-941195-4-8